अहिल्यानगर ▪ बुधवार, दि. ७ मे २०२५ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक २६ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145

॥ श्री ॥

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

# पाकिस्तानातील ९ ठिकाणी भारताचा हवाई हल्ला

**। मध्यरात्री भारताचे 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी**
**। २३ मिनिटात ९ दहशतवादी तळ उद्धवस्त**

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यापासून भारतात तीव्र संताप व्यक्त केली जात होती. पाकिस्तानला धडा शिकवला जावा, अशी मागणी केली जात होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील भारताला समर्थन मिळत होतं. गेल्या काही दिवसांपासून केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय बैठका होत असताना लवकरच काहीतरी मोठं घडण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्याचं उत्तर आता मिळालं असून भारतानं पाकिस्तानच्या हद्दीत घुसून तब्बल ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले आहेत. मध्यरात्री दीडच्या सुमारास भारतीय हवाई दलानं एअर स्ट्राईक केला आहे. या मोहिमेला भारतानं 'ऑपरेशन सिंदूर' असं नाव दिलं आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूर लाँच केलं आहे. या ऑपरेशनअंतर्गत भारतीय लष्कर आणि हवाई दलाने मिळून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी ठिकाणांवर क्षेपणास्त्रांनी हल्ला करण्यात आला आहे. भारतीय सैन्यदलानं पाकव्याप्त काश्मीरमधील मुजफ्फराबादमध्ये ९ ठिकाणांवर स्ट्राइक केला आहे.

भारतीय लष्कराने एका प्रसिद्धीपत्रकात दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईअंतर्गत, लष्कराने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांना लक्ष्य केलं, जिथून भारताविरुद्ध दहशतवादी हल्ले आखले जात होते आणि हल्ल्याचे निर्देश दिले जात होते. या हल्ल्यांमध्ये भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दल या तिन्ही दलांच्या अचूक शस्त्र प्रणालींचा वापर करण्यात आला.




**या ९ ठिकाणांवर एअर स्ट्राईक**

१) बहावलपूर, २) मुरिदके, ३) गुलपूर, ४) भीमबर, ५) चक अमरु, ६) बाग, ७) कोटली, ८) सियालकोट, ९) मुजफ्फराबाद

## SPOT NEWS

### पेट्रोल-डिझेलच्या उत्पादन शुल्कात वाढ

**● नवी दिल्ली –** देशात इंधन दरांबाबत एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात थेट २ रुपयांची वाढ केली आहे. सामान्य नागरिकांमध्ये यामुळे इंधन महागण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, सरकारने तात्काळ स्पष्ट केले की, या निर्णयाचा थेट परिणाम ग्राहकांवर होणार नाही. उत्पादन शुल्क हा केंद्र सरकारचा पेट्रोल आणि डिझेलवर लावलेला कर आहे. हा कर इंधनाच्या किंमतीचा मोठा भाग व्यापतो. सध्या पेट्रोलवर १३ रुपये प्रति लिटर आणि डिझेलवर १० रुपये प्रति लिटर उत्पादन शुल्क आहे. २०१४ मध्ये पेट्रोलवर ९.४८ रुपये आणि डिझेलवर ३.५६ रुपये प्रति लिटर शुल्क होते. गेल्या काही वर्षांत या दरात अनेकदा वाढ झाली.

### दहशतवादाविरोधात अमेरिका भारतासोबत

**● नवी दिल्ली –** जम्मू–काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भ्याड हल्ल्याचा जगभरातून निषेध केला जात आहे. या हल्ल्यानंतर अनेक देशांनी पीडित कुटुंबांबद्दल शोक व्यक्त केला अन् दहशतवादाविरोधात भारताच्या बाजूने असल्याचे जाहीर केले. अशातच आता अमेरिकेनेदेखील दहशतवादाविरोधात जाहीरपणे भारताला पाठिंबा दिला आहे. अमेरिकन हाऊस स्पीकर माइक जॉन्सन यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि ट्रम्प प्रशासन भारताच्या बाजूने असल्याची घोषणा केली. ही घोषणा भारतासाठी हिरवा कंदील आणि पाकिस्तानसाठी धोक्याची घंटना मानली जात आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या

**सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा आदेश**

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यासह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटले की, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची अधिसूचना पुढील चार आठवड्यात निघाली पाहिजे. यानंतर चार महिन्यांत निवडणुकीची प्रक्रिया संपन्न झाली पाहिजे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिले आहेत.

महाराष्ट्रात पंचायत निवडणुकीतील ओबीसी आरक्षण प्रकरणावर सुनावणी करताना न्या. सूर्यकांत म्हणाले की, देशात आरक्षण हे रेल्वेच्या डब्यासारखे झाले आहे. जे लोक त्यात चढले आहेत, ते दुसऱ्यांना आत येऊ द्यायला तयार नाहीत. याचिकाकर्त्यांतर्फे इंदिरा जयसिंह यांनी सुप्रीम कोर्टाकडे महाराष्ट्रात पंचायत निवडणुका घेण्याची मागणी केली. इंदिरा जयसिंह म्हणाल्या की, निवडून आलेल्या स्थानिक संस्था अस्तित्वात नाहीत, त्यांच्या जागी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्या. सूर्यकांत म्हणाले की, फक्त काही विशिष्ट वर्गांनाच आरक्षण का मिळावे? सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या इतर लोकांना आरक्षण का मिळू नये? यावर विचार करणे ही राज्यांची जबाबदारी आहे, असे न्यायमूर्तींनी म्हटले.

या निवडणुका अडवून ठेवण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, ओबीसी आरक्षणाबाबत २०२२ च्या आधीची परिस्थिती होती, ती परिस्थिती कायम ठेवावी. याचिकाकर्त्यांनी म्हटले होते की, २०२२ मध्ये अहवाल आला त्यामध्ये ओबीसींच्या जागा कमी करण्यात आल्या. त्यामुळे न्यायालयाने २०२२ पूर्वीची परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले. राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला सप्टेंबर महिन्यापर्यंत राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे जवळपास पाच वर्षांपासून रखडलेल्या मुंबई–पुण्यासह विविध महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पंचायत निवडणुका घेण्यास हिरवा कंदील मिळाला आहे.

आज आम्ही एक मुद्दा सगळ्यात महत्त्वाचा अधोरेखित केला तो असा आहे की महाराष्ट्रामध्ये आज पाच वर्षांपेक्षा अनेक प्रकरणांमध्ये प्रशासक जे आहेत जे राज्यघटनेची आपली जी मूळ तरतूद आहे की लोकप्रतिनिधींनी सर्व लोकल बॉडी चालवाव्यात, त्याच्याही विपरीत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा नमूद केलं की, तुमच्या कार्पोरेशनमध्ये औरंगाबाद, नवी मुंबई येथे पाच वर्षांपेक्षा जास्त कार्यकाळ हा प्रशासकांचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने असेही सांगितलं की बऱ्याचशा तक्रारी आमच्यासमोर आल्या आहेत. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर असणे आवश्यक आहे.

त्यानंतर सर्व पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने विचारलं की इलेक्शन घेण्याला कोणाचा विरोध आहे का? तर सर्व पक्षांनी आज असं सांगितलं की इलेक्शन घेण्याला कोणाचाही विरोध नाही. फक्त निवडणुका लवकरात लवकर व्हाव्यात आणि या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या माध्यमातून व्हाव्यात. कारण राज्य सरकारने त्यांचे अधिकार काढून घेतलेले आहेत.

## तीर्थस्थळ विकासासाठी ५ हजार कोटी

**चोंडीसह तुळजापूर, माहूरगड, कोल्हापूर, नाशिकच्या आराखड्याचा समावेश । चोंडी येथील मंत्रिपरिषदेच्या बैठकीत निर्णय**

**● नगर । वीरभूमी–**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून जामखेड तालुक्यातील चोंडी येथे आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत राज्यातील ७ तीर्थस्थळांच्या विकासासाठी ५ हजार ५०३ कोटी रुपयांच्या आराखड्यांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धनासाठी ६८१. ३२ कोटी, अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जिर्णोद्धारासाठी (लेण्याद्री वगळता) १४७.८१ कोटी, श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा १ हजार ८६५ कोटी, श्री क्षेत्र जोतीबा मंदिर विकास आराखडा २५९.५९ कोटी, नाशिकमधील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखडा २७५ कोटी, कोल्हापूर श्री क्षेत्र महालक्ष्मी विकास आराखडा १ हजार ४४५ कोटी, नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहूरगड विकास आराखडा ८२९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.



राज्य विधिमंडळाच्या इतिहासात प्रथमच आज चोंडी येथे म्हणजेच ग्रामीण भागात राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यात अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

सोबतच मुलींचे स्वतंत्र आयटीआयदेखील असणार असल्याचे ते म्हणाले. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश द्यायचा, यासाठी यशवंत योजना सुरु केली आहे. आता १० हजार विद्यार्थी आपण यातून शिकवणार आहोत. सोबतच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजना सुरु करत आहोत. अशी महत्वपूर्ण घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

राज्यात महिला सक्षमीकरणासाठी सरकार आदिशक्ती अभियान राबवणार आहे. समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न असेल. जे काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले तेच काम आमचे सरकार करणार आहे. यासोबतच अहिल्यादेवींचे जीवन आणि कार्याचा सन्मान झाला पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या जीवन चरित्रावर आधारित मराठीसह बहुभाषिक व्यावसायिक चित्रपट निर्मिती करण्यास मंगळवारी चोंडी येथे झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. तसेच अहिल्यानगरमध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या विहिरींचे जलसंधारण विभागाने पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये १९ विहिरी, ६ कुंडांसह ३४ जलाशयाच्या संवर्धनाचे काम केले जाणार आहे. यासोबतच अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दीनिमित्त डाक तिकीटसह प्रेरणा गीतही जारी केले.

## मारहाणी तरुणाचा खून; एकावर गुन्हा दाखल

**खुनाच्या घटनेने अकोले तालुक्यात उडाली खळबळ**

**● अकोले । वीरभूमी–**

मुलीला भेटायला गेलेल्या तरुणाला मुलीच्या नातेवाईकांनी केलेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील पळसुनदे येथे घडली. या घटनेत मृत झालेल्या तरुणाचे नाव नवनाथ तुकाराम पडवळे (वय १९ वर्षे) असे असून याप्रकरणी योगेश यशवंत दुटे (रा. पळसुंदे) याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मयताचे वडील तुकाराम भावका पडवळे (रा. पांगरी) यांनी अकोले पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हटले आहे की, मुलगा नवनाथ हा इयत्ता बारावीच्या वर्गात शिक्षण घेत होता. त्याचे एका मुलीबरोबर प्रेम प्रकरण चालु असल्याचे मला दोन महिन्यापुर्वी समजले होते. तेंव्हा मी त्याला तु शाळा शिक दुसरे कुटाने करु नको, असे समजावुन सांगीतले होते. त्यानंतर दि. ५/५/२०२५ रोजी माझे मेव्हणे भागा महादु दिघे यांचे मुलाचा साखरपुडा व हळदीचा कार्यक्रम नागमळा सातेवाडी येथे असल्याने आम्ही सर्वजण कार्यक्रमाला गेलो होतो. यावेळी हळदीचा कार्यक्रम संपल्यानंतर मुलगा नवनाथ मला म्हणाला की, मी आपले घरी जातो. मला मोटारसायकल द्या, तुम्ही व आई येथेच मुक्कामी थांबा, असे सांगून रात्री ११:३० वाजता घरी जातो असे सांगुन गाडीवर गेला. त्यानंतर तो पहाटे ५:३० वा.चे सुमारास त्या मुलीस भेटण्यास गेला असता तिथे त्याला मुलीचा नातेवाईक योगेश दुटे याने मारहाण करुन त्याचा खून केला. या फिर्यादीवरुन अकोले पोलिसांत गुरन. २५९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेने तालुक्यात खळबळ उडाली असुन पुढील तपास पोनि. मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. संदिप हजारे करत आहेत.

## अपघातातील जखमींवर होणार कॅशलेस उपचार

**परिवहन मंत्रालयाकडून नव्या योजनेची अधिसूचना जारी**

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

अपघातातील जखमींना वेळीच उपचार मिळावेत आणि प्राण वाचावेत यासाठी केंद्र सरकारने कॅशलेस उपचार योजना आणली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग आणि परिवहन मंत्रायलयाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. देशभरात अपघातातील जखमींना कोणत्याही रुग्णालयात कॅशलेस उपचार मिळणार आहे.

अपघातातील जखमींना कॅशलेस उपचार योजना २०२५ नुसार, मान्यताप्राप्त कोणत्याही रुग्णालयात जखमींना दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार मिळणार आहे. अपघात झालेल्या दिवसापासून सात दिवसांच्या उपचाराचे पैसे मिळणार आहेत. ही योजना सोमवारपासून म्हणजे ५ मे २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी



जानेवारी २०२५ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. अपघातातील जखमींसाठी केंद्र सरकार सुधारित योजना घेऊन येत आहे असे त्यांनी सांगितले होते.

कॅशलेस उपचार योजनेचा लाभ घेण्याचे तीन टप्पे आहेत. पहिला म्हणजे अपघातानंतर जखमींना तात्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागेल. केंद्र सरकार या सरकारी हॉस्पिटलची यादी जारी करेल. दुसरा म्हणजे अपघातानंतर २४ तासांत पोलिसांना कळवावे लागेल, अपघाताची संपूर्ण माहिती, जखमींच्या प्रकृती पोलिसांना सांगावे लागेल. तिसरा म्हणजे जखमींची फाईल तयार होईल. त्यात पोलिस रिपोर्ट, जखमीचे ओळख पत्र जमा करावे लागेल.

ही प्रक्रिया पार पाडल्यानंतर जखमी व्यक्तीला १.५ लाख रुपये दिले जातील. ज्यामुळे अपघाताच्या दिवसापासून पुढील ७ दिवसांसाठी १.५ लाख रुपयांचे मोफत उपचार दिले जातील. जखमींना प्रवेशावेळी कुठलेही शुल्क द्यावे लागणार नाही. प्राथमिक उपचार मोफत मिळतील. गंभीर रित्या जखमी झाल्यास सर्जरीची सुविधा मिळेल. त्याचबरोबर एक्स रे, सीटी स्कॅन, एमआरआयसारख्या सुविधा मोफत मिळतील. उपचारावेळी दिली जाणारी औषधे मोफत असतील.

# SPOT NEWS

## श्रमिक महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत प्राजक्त सावंत टॉपरच्या यादीत

● **अकोले । वीरभूमी–**

श्रमिक महाविद्यालय संगमनेर च्या विज्ञान शाखेत अकोले



तालुक्यातील पाडाळणे येथील प्राजक्त बाळासाहेब सावंत हा ८९.८३% गुण मिळवून टॉपर मध्ये उत्तीर्ण झाला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणताही न्यूनगंड बाळगला नाही तर प्राजक्त सावंत सारखे विद्यार्थी संगमनेर तालुक्यातही यशस्वी होऊ शकतो हे दाखवून दिले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा भाजप कोतुळ मंडलचे अध्यक्ष बाळासाहेब गणपत सावंत यांचा चिरंजीव प्राजक्त याने ८९.८३% गुण संपादन केले आहे.त्याच्या या यशाबद्दल माजी आमदार वैभवराव पिचड,अमृतसागर दूध संघाचे व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, जनरल मॅनेजर दादाभाऊ सावंत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व पदाधिकारी व संचालक आदीसह अनेक मान्यवरांनी व मित्रमंडळाने प्राजक्त सावंत याचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा बारावी बोर्डाचा शंभर टक्के निकाल

● **नगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या (एचएससी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व कॉमर्स दोन्ही विभागांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यावर्षी देखील संख्यात्मक व गुणात्मक निकाल सर्वोत्कृष्ट लागला आहे. वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५०% गुण मिळवून सायन्स विभागात विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर आर्यन कैलास बोरा याने ९५.६७% गुण मिळवून कॉमर्स विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच आर्यन कैलास बोरा, प्रेम आनंद कोठारी, पार्थ मंगेश चंगेडिया, स्मित संतोष गुगळे या विद्यार्थ्यांनी बुक कीपिंग ॲण्ड अकाउंटन्सी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. त्याचप्रमाणे गणित व आयटी विषयांमध्ये आर्यन कैलास बोरा याने शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अभय फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळाचे सदस्य तसेच विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपमुख्याध्यापक पोपट पवार, पर्यवेक्षक बाळू वाव्हळ, विष्णु गिरी, कैलास साबळे यांनी केले.

## नेप्ती ग्रामस्थांनी दिले ग्रेटर फ्लेमिंगो पक्ष्याला जीवदान

● **नगर । वीरभूमी–**

नगर–कल्याण रोडवरील नेप्ती शिवारात मंगळवारी (दि.६ मे) एक हृदयस्पर्शी घटना घडली. परदेशातून स्थलांतरित होणाऱ्या ग्रेटर फ्लेमिंगो या दुर्मीळ व नाजूक पक्ष्याला गावातील काही सजग नागरिकांनी मोकाट कुत्र्यांच्या तावडीतून वाचवले. माजी उपसरपंच बाबासाहेब बन्सी होळकर आणि विशाल गडाख यांच्या सतर्कतेमुळे या विदेशी पक्ष्याचे प्राण वाचले असून, त्याला तत्काळ वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले. होळकर व गडाख हे हिंगणगाव येथे दुचाकीने जात असताना, नेप्ती शिवारात अचानक काही कुत्रे जोरजोरात भुंकताना दिसले. याकडे लक्ष वेधल्यावर त्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता, एक जखमी ग्रेटर फ्लेमिंगो पक्षी त्यांच्या तावडीत होता. क्षणाचाही विलंब न करता, त्यांनी धाडसाने मोकाट कुत्र्यांना हाकलून लावले व पक्ष्याचा जीव वाचवला. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांच्याशी संपर्क साधून मदतीसाठी बोलावले. त्यानंतर फुले यांनी वन विभागाशी संपर्क साधला असता, थोड्याच वेळात प्राणीमित्र हर्षद कटारिया व वन विभागाचे अधिकारी सुभाष हंडोरे आणि संदीप ठोंबरे घटनास्थळी दाखल होत उपचार केले.

# खरीपसाठी शेतकऱ्यांना मुबलक बियाणे, खते उपलब्ध करून द्या

### आ.आशुतोष काळे । कोपरगाव पंचायत समिती कार्यालयात खरीप हंगाम नियोजन बैठक

● **कोपरगाव । वीरभूमी –**

मागील काहीवर्षीप्रमाणे याहीवर्षी चांगले पर्जन्यमान होईल असा हवामान खात्याकडून अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बियाणे व खतांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासणार असून त्यासाठी खरीप हंगामाचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना वेळेत मुबलक बियाणे व खते उपलब्ध करून द्या अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कृषी विभागाला दिल्या आहेत.



आ.आशुतोष काळे यांनी सोमवार (दि.०५) रोजी कोपरगाव येथे पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत खरीप हंगाम आढावा व नियोजन बैठक घेतली. या बैठकीत कोपरगाव विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांना खरीप हंगामातील येणाऱ्या संभाव्य अडचणी टाळण्याबाबत त्यांनी कृषी विभागाला मार्गदर्शन केले.

यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, मागील पाच वर्षात २०२३ चा अपवाद वगळला तर दरवर्षी समाधनकारक पर्जन्यमान झाले आहे व कृषी विभागाने देखील आपली जबाबदारी चोखपणे पार पडल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी आल्या नाहीत. कृषी विभागाने जबाबदारीने दिलेल्या योगदानाची दखल घेवून राज्यात दुसऱ्या क्रमांकाचे आयएसओ मानांकन मिळाल्याबद्दल त्यांनी कृषी विभागाचे कौतुक केले. ज्याप्रमाणे मागील वर्षी शासनाच्या विविध योजनांचा लाभ कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळवून दिला त्याप्रमाणेच याहीवर्षी जास्तीत जास्त शासनाच्या लाभाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळवून द्या. तसेच खरीप हंगामात राबविण्यात येणाऱ्या विविध मोहिमा प्रभावीपणे राबवा.

शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणे शेतकऱ्यांना खतांचा व बियाणांचा पुरवठा कसा होईल जेणेकरून शेतकऱ्यांच्या पेरण्या योग्य वेळेत होवून त्यांना चांगले उत्पन्न मिळेल व त्यांना जास्तीत जास्त आर्थिक फायदा कसा होईल याची काळजी घ्या. मागील वर्षी झालेले पर्जन्यमान पाहता यावर्षी पाणी टंचाई जाणवणार नाही असा सर्वांचांच अंदाज होता परंतु फेब्रुवारी महिन्यापासूनच उन्हाची तीव्रता अधिकच जाणवू लागल्यामुळे सर्वांचेच अंदाज चुकले आहेत. त्यामुळे यापुढील काळात पाणी बचतीवर भर द्यावा लागणार आहे त्यासाठी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याबाबत कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. शेती उत्पन्न वाढविण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना येत असल्या तरी खर्चाचा ताळमेळ बसने गरजेचे आहे. विभक्त कुटुंब पद्धती त्यामुळे शेती क्षेत्र कमी होत चालले असून कमी क्षेत्रात शेतीची कोणकोणती औजारे घ्यायची असा प्रश्न शेतकऱ्यांना पडत असतो त्यासाठी शेतकऱ्यांनी सामुहिक शेती किंवा गटशेती पर्याय निवडणे गरजेचे असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले. बियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, व शेतकऱ्यांच्या तक्रारी येणार नाही याची गांभीर्याने काळजी घ्यावी अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी या बैठकीत केल्या. याप्रसंगी काही शेतकऱ्यांना ट्रॅक्टर अवजाराची वाटप करण्यात येवून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुगृह अनुदान योजना अंतर्गत अनुदानाचे आदेश प्रमाणपत्र आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी विलास गायकवाड, गटविकास अधिकारी संदीप दळवी, कृषी अधिकारी मनोज सोनवणे, पं.स. कृषी अधिकारी सचिन कोष्टी, सर्व मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक व शेतकरी आदी उपस्थित होते.

## तारकेश्वर गडावर शुक्रवारी श्री संत नारायण बाबांचा १४ वा पुण्यतिथी सोहळा

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती





● **पाथर्डी । वीरभूमी–**

तारकेश्वर गडाचे संस्थापक वेदांताचार्य वै. ह.भ.प. श्री संत नारायण बाबा यांची १४ वी पुण्यतिथी शुक्रवार दि. ९ मे रोजी मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरी होणार आहे. या भव्य दिव्य सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती गडाचे मठाधिपती महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी दिली.

या निमित्ताने संपूर्ण तारकेश्वर गड जय्यत तयारीने सज्ज झाला आहे. संत नारायण बाबांनी तहानल्याची तहान, भुकेल्याची भूक जाणावी या सेवाभावी विचारसरणीवर आध्यात्मिक कार्यासोबत समाज प्रबोधनही केले. दुष्काळाच्या कठीण काळातही त्यांनी गाईंची सेवा करत गोसंवर्धनाचे महान कार्य केले. त्यांच्या कार्याची परंपरा महंत आदिनाथ महाराज शास्त्री प्रामाणिकपणे पुढे नेत आहेत. सध्या गडावर शेकडो गायींची सेवा होत असून नवीन भव्य गोशाळेचे बांधकामही सुरू आहे.

गड परिसरात हिरवळ फुललेली असून, स्वच्छता आणि मंडप उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. लाखो भाविकांसाठी महाप्रसादाची भव्य योजना राबवण्यात येत आहे. यावर्षीच्या पुण्यतिथी सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती असल्यामुळे भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. त्यामुळे सुरक्षा, वाहतूक आणि सोयी–सुविधांसाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला, गुरुवार दि. ८ मे रोजी संध्याकाळी ९ ते ११ या वेळेत शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व वारकरी संप्रदाय युवा मंचाचे अध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवार, ९ मे रोजी सकाळी मठाधिपती आदिनाथ महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन आहे. या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धर्मजागरण प्रांत महासंयोजक मिलिंद वाईकर, प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे, आमदार मोनिका राजळे यांची उपस्थिती राहणार आहे. संयोजन समितीने सर्व भाविकांना या भव्य दिव्य सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन गडाच्या वतीने केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृहाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

● **नगर । वीरभूमी–**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. शासकीय विश्रामगृह सर्व सोयीसुविधांसह सज्ज ठेवावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शासकीय विश्रामगृहाच्या नवीन इमारतीची पाहणी केली. यावेळी ते म्हणाले, अहिल्यानगर शहरात ही एक देखणी वास्तू निर्माण झाली आहे. या ठिकाणचा परिसर स्वच्छ ठेवावा आणि इमारतीची देखभाल योग्य करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.





अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहाचे विस्तारीकरण करण्यात आले असून या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यात आली आहे. यासाठी ६ कोटी ७५ लाख रुपये खर्च आला. यामध्ये तळमजल्यावर २ व्हीव्हीआयपी कक्ष, १ व्हीआयपी कक्ष, भोजन कक्ष, बैठक कक्ष, स्वयंपाकगृह, भांडार, स्वागत कक्ष आहेत. पहिल्या मजल्यावर २ व्हीव्हीआयपी व ३ व्हीआयपी कक्ष असून ७५ व्यक्तींची क्षमता असलेले सभागृहही उभारण्यात आले आहे.

अहिल्यानगर येथील बांधकाम भवन येथे अधीक्षक अभियंता कार्यालय, कार्यकारी अभियंता व उप अभियंता कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. १३ कोटी ३१ लक्ष ४२ हजार ८३८ रुपये खर्च करुन उभारण्यात येत असलेली ही इमारत सर्व सुविधांनी युक्त आहे. पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर कार्यकारी अभियंता कार्यालय, उपविभागीय कार्यालय असून तिसऱ्या मजल्यावर अधीक्षक अभियंता कार्यालय, बैठक कक्ष, सभागृह, अभिलेख कक्ष उभारण्यात येणार आहे.

# थोरात कारखान्याच्या मदतीने संगमनेर बसस्थानकाची स्वच्छता

### फायर फायटरच्या माध्यमातून बसस्थानक परिसर झाला चकाचक

● **संगमनेर । वीरभूमी–**

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा. महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून व पाठपुराव्यातून संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी हायटेक बस स्थानक उभे आहे. या बसस्थानकात सर्व अत्याधुनिक सुविधा असून महाराष्ट्रातील आदर्शवत असलेल्या या बसस्थानकाची स्वच्छता सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या यंत्रणेच्या मदतीने केल्याने हा परिसर स्वच्छ झाला आहे.

संगमनेर बसस्थानक हे शहरातील मध्यवर्ती व महत्त्वाचे ठिकाण आहे. प्रवाशांची या ठिकाणी सातत्याने मोठी वर्दळ असते. यासर्व प्रवाशांना चांगली सुविधा व्हावा याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी अत्यंत अत्याधुनिक बसस्थानक निर्माण केले आहे. हे बसस्थानक म्हणजे संगमनेर एअरपोर्ट असा याचा अभिमानाने सर्वजण उल्लेख करतात. सर्व सुविधा, त्याचप्रमाणे शॉपिंग कॉम्प्लेक्स असल्याने बस स्थानक परिसरात तालुक्यातून व शहरातून आलेल्या नागरिकांचा मोठा वावर असतो.

बसस्थानकाचा परिसर मोठा असल्याने नागरिकांच्या वरदळी मधून या ठिकाणी अस्वच्छता निर्माण होते. येणाऱ्या सर्व प्रवाशांना प्रसन्न वातावरण मिळावे याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या फायर उपलब्ध करून देण्यात आले.

या माध्यमातून सर्व बसस्थानक परिसर धुवून स्वच्छ करण्यात आला. प्रवाशांसाठी




अत्यंत प्रसन्न व स्वच्छ वातावरण या ठिकाणी निर्माण झाले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम तालुक्याच्या व शहराच्या विविध कामांमध्ये मोठी मदत केली आहे. कारखान्याच्या अग्निशमन दलाच्या फायर फायटर मधून सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला असून या विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतल्याने सर्व प्रवासी व नागरिकांनी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना व लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे यशोधन जनसंपर्क कार्यालय यांचे अभिनंदन केले आहे.

### कारखान्याकडून स्वच्छतेसाठी मदतीचे काम

■ संगमनेर हायटेक बस स्थानकाचा परिसर मोठा असून नागरिकांची मोठी संख्या या ठिकाणी असते. सर्व चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असते. या परिसराच्या स्वच्छतेसाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी येथे येऊन सर्व परिसर धुवून साफ करण्यास मोठी मदत केली आहे. हा एक सामाजिक उपक्रमातून यामधील सहभागाबद्दल आम्ही कारखाना प्रशासनाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो.

**– प्रशांत गुंड पाटील,**
आगार प्रमुख, संगमनेर बसस्थानक

# SPOT NEWS

## डॉ. राजीव जाधव यांना रसायनशास्त्र विषयात पीएच. डी प्राप्त

**● पाथर्डी । वीरभूमी–**



शिरेगाव येथील रहिवाशी तथा सध्या आयर्लंड येथे कार्यरत असणारे डॉ. राजीव अण्णासाहेब जाधव यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा छत्रपती संभाजीनगर विद्यापीठा मार्फत नुकतीच पीएच. डी प्राप्त झाली आहे. रसायनशास्त्र विषयामध्ये त्यांनी Analytical Method Development and Validation for Quality Determination of Bioactive Drug Substances and Products या विषयावरती संशोधन केले. या संशोधनाशी निगडित त्यांचे काही रिसर्च पेपर हे नॅशनल व इंटरनॅशनल स्तरावर प्रकाशित आहेत. या संशोधनाकरीता त्यांना डॉ. सरोज बेंबाळकर यांचे मार्गदर्शक म्हणून बहुमोल मार्गदर्शन लाभले. या मिळालेल्या यशाबद्दल डॉ.जाधव यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

## सरोज आल्हाट ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी

**● नगर । वीरभूमी–**



निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन १४ मे रोजी करण्यात आले असून, या संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवयित्री व साहित्यिक सरोज आल्हाट यांची निवड करण्यात आली आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता परिवार मंगल कार्यालय येथे या संमेलनाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून, संमेलनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यावर आधारित ग्रंथ दिंडी गावातून काढण्यात येणार आहे.या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंतांचे परिसंवाद, व्याख्याने, कवी संमेलन, तसेच ग्रंथ प्रदर्शन यांचा समावेश असून, एक साहित्यिक पर्वणीच ठरणार आहे, अशी माहिती संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. संमेलनाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी भूषविणाऱ्या सरोज आल्हाट या गेली ३० वर्षे साहित्य, समाजसेवा आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिल्ली येथे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत एतिहासिक बहुभाषिक कवी संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या मराठीत चार आणि इंग्रजीत एक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. पहिल्या ग्रामीण ख्रिस्ती साहित्य संमेलनातील काव्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील त्यांनी भूषविले होते. साहित्य क्षेत्रातील अनेक मानाचे पुरस्कार देखील त्यांना मिळाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे पै. नाना डोंगरे यांनी सांगितले आहे. आल्हाट यांची ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी गिताराम नरवडे, गझलकार रज्जाक शेख, भारत सातपुते, आनंदा साळवे, सुभाष सोनवणे, मिराबक्ष शेख, गुंफा कोकाटे, शंकर चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# कोपरगावचा पाणी पुरवठा लवकरच पूर्ववत

## आ. आशुतोष काळे । चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे काम पूर्ण

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करणाऱ्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे पंपिंग स्टेशनचे काम पूर्ण करण्यासाठी देण्यात आलेला कालावधी आठ दिवसाचा होता. त्या कालावधीत दिलेले काम पूर्ण झाले असून सुरु असलेल्या आवर्तनातून सर्व साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरतील व कोपरगाव शहरातील नागरीकांना पुन्हा नियमितपणे पूर्ववत पाणी पुरवठा होणार आहे अशी माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.




कोपरगाव शहरातील नागरीकांच्या कोपरगाव नगरपरिषदेच्या सबंधित असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आ.आशुतोष काळे यांनी सोमवार (दि.०५) रोजी कोपरगाव तहसील कार्यालयात जनता दरबार आयोजित केला होता. यावेळी शहरातील विविध नागरी समस्या घेऊन आलेल्या नागरिकांनी जनता दरबारात मोठ्या संख्येने हजेरी लावली. या जनता दरबारात शहरातील नागरिकांनी अनेक समस्या मांडल्या. यामध्ये पाणी पुरवठ्याच्या बाबत देखील नागरिकांच्या आलेल्या तक्रारी ऐकून घेत त्यांनी सांगितले की, चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे पंपिंग स्टेशनचे काम पूर्ण झाले आहे. २०० अश्व शक्तीच्या वीज पंपाच्या माध्यमातून दोन दिवसात जवळपास अर्धा म्हणजेच पन्नास टक्के ५ नंबर साठवण तलाव भरण्यात येणार आहे व उर्वरित नेहमीच्या पद्धतीने भरण्यात येणार आहे त्याचा फायदा चार नंबर साठवण तलावाला देखील होणार आहे. चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे काम पूर्ण झाले असून सुरु असलेल्या उन्हाळी आवर्तनातून चार व पाच नंबर साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून मिळतील. मागील आवर्तनाच्या वेळी पाटबंधारे विभागाला पाण्याची मोठी तुट सोसावी लागल्यामुळे विलंब झाला त्यामुळे साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरले गेले नाहीत. त्यामुळे अडचणी निर्माण झाल्या. परंतु यावेळी मागील आवर्तनाच्या तुलनेत या आवर्तनासाठी सिंचनासाठी क्षेत्र काहीसे कमी आहे व मागील आवर्तनावेळी आलेल्या अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून मिळतील. व पुन्हा नागरीकांना नियमितपणे पूर्ववत पाणी पुरवठा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कोपरगाव शहरातील प्रलंबित विकास कामाबाबत नागरिकांच्या तक्रारी मांडल्या. त्यावेळी ते म्हणाले की, कोपरगाव शहरासाठी दिलेल्या निधीतून अनेक कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्याबाबत ठेकेदारांची देखील लवकरच बैठक घेणार आहे. सबंधित ठेकेदार आपल्याकडील कामे किती दिवसात पूर्ण करणार याबाबत सविस्तर खुलासा घेवू, जेणेकरून नवीन विकास कामांच्या निविदा प्रसिद्ध होतांना हि कामे घेवून पुन्हा अशीच परिस्थिती निर्माण होवू नये यासाठी योग्य ती काळजी घेवून पहिली कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी सबंधित ठेकेदारांना रीतसर कोपरगाव नगरपरिषदेकडून नोटीसा देण्यात येतील. त्याबाबत कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाला सूचना केल्या आहेत. सर्व तक्रारींना गांभीर्याने घेत अधिकाऱ्यांना त्यांनी त्वरित कार्यवाहीचे आदेश देतांना ते म्हणाले की, जनतेच्या समस्या ऐकणे आणि त्यावर तातडीने उपाय करणे हे माझे कर्तव्य आहे. प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे अत्यंत गरजेचे असून यापुढे नागरिकांच्या तक्रारी येणार नाही याची काळजी घ्या अशा सूचना दिल्या. यावेळी कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरीक व नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाचा सार्थक देशमुख बारावीला पाथर्डी तालुक्यात प्रथम

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शहरातील बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी सार्थक विठ्ठल देशमुख याने यावर्षी बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ९४ टक्के गुण मिळवत पाथर्डी तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला.



यावर्षीचा इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला यामध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखा ८९ टक्के, कला शाखा ४४ टक्के, वाणिज्य शाखा ६० टक्के तर किमान कौशल्य शाखेचा निकाल ५० टक्के लागला.

विज्ञान शाखेमध्ये सार्थक विठ्ठल देशमुख ९४ टक्के (प्रथम), शहाणे सार्थक महेश ८७.३३ टक्के (द्वितीय), तुपे सृष्टी बाळासाहेब ७८.८३ टक्के (तृतीय), सय्यद अलीषा रज्जाक ७८.८३ टक्के (तृतीय). कला शाखेमध्ये बोरुडे निखिल अशोक ७७ टक्के (प्रथम), गर्जे अक्षय गोकुळ ७४ टक्के (द्वितीय), सांगळे तनुजा विजय ६२.५० टक्के (तृतीय), शेख मुस्कान मेहमूद ६२.५० टक्के (तृतीय). वाणिज्य शाखेमध्ये सोनटक्के शैलेश महादेव ७४.१७ टक्के (प्रथम), बंग मधुरा रामनाथ ६५ टक्के (द्वितीय), लाटणे वैष्णवी संदीप ६३.८३ टक्के (तृतीय). तर किमान कौशल्य शाखेमध्ये खेडे वर्षा भास्कर (प्रथम), साळवे राजश्री सुनील (द्वितीय), ढुकले सरला अशोक (तृतीय) क्रमांक पटकावला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विठ्ठल देशमुख, बाळासाहेब तुपे, महेश शहाणे, रामनाथ बंग, संदीप लाटणे, मेहमूद शेख आदी पालक व सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक उपस्थित होते.

सर्व शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे, पर्यवेक्षक प्रा. सलिम शेख यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## एस.एस.जी.एम. महाविद्यालयाची बारावी बोर्ड परिक्षेचा उत्कृष्ठ निकाल

**● कोपरगाव । वीरभूमी–**

इ. १२ बोर्ड परीक्षेचा निकाल दि. ०५ मे, २०२५ रोजी जाहीर करण्यात आला असून सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाचा विज्ञान शाखेचा ९८.०६%, वाणिज्य शाखेचा ६९.७१%, कला शाखेचा ५०.६६% व किमान कौशल्य शाखेचा ४१.६७% निकाल लागला असून गुणानुक्रमे विज्ञान शाखेत चि. खरात कुणाल अनिल ८२.५०% (प्रथम), चि. केकाण नरेश बाळासाहेब ८१.६७% (द्वितीय), चि. तुवर सार्थक आप्पासाहेब ८१.००% (तृतीय), वाणिज्य शाखेत कु. वायंदेशकर नेहा सुनिल ८७.५०% (प्रथम), चि. गायकवाड नितीन राजू ८७.००% (द्वितीय), कु. भसाळे श्रावणी उमेश ८२.५०% (तृतीय), कला शाखेत कु. पाचुंदकर निलम दिलीप ८०.८३% (प्रथम), कु. अहिरे प्रतिक्षा रायभान ६८.३३% (द्वितीय), कु. मोरे ओमकार भाऊसाहेब ६७.६७% (तृतीय), किमान कौशल्य शाखेत चि. वाघ गौरव कचेश्वर ५३.६७% (प्रथम), चि. सानप ओम शरद ५२.६७% (द्वितीय), चि. बोऱ्हाडे शुभम सुनिल ५०.१७% (तृतीय) आलेले विद्यार्थी असून मा.आ.आशुतोष काळे साहेब, माजी आमदार सौ. स्नेहलताताई कोल्हे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.ॲड. भगिरथ शिंदे, सदस्य श्री. विवेक कोल्हे, सौ. चैतालीताई काळे, ॲड. संदीप वर्पे, श्री. सुनिल गंगुले, श्री. महेंद्रशेठ काले, श्री. बाळासाहेब आव्हाड, प्राचार्य डॉ. माधव सरोदे, ज्युनिअरचे उपप्राचार्य श्री. संजय शिंदे, कार्यालय अधिक्षक श्री. सुनिल गोसावी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते ‘पाणीदार अहिल्यानगर’ पुस्तिकेचे प्रकाशन




**● नगर । वीरभूमी–**

चौंडी येथील मंत्री परिषद बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा जलसंधारण अधिकारी निर्मित आणि जिल्हा माहिती कार्यालयाने संपादित केलेल्या ’पाणीदार अहिल्यानगर’ पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्रिमंडळ सदस्य आदी उपस्थित होते.

मृद व जलसंधारण विभागाच्या गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार, जलयुक्त शिवार २.०, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना यांसारख्या इतर योजनांच्या अंमलबजावणीत जिल्ह्याने चांगली कामगिरी केली आहे. पुस्तिकेत जिल्ह्याच्या या यशाची माहिती देण्यात आली आहे. जिल्ह्यात जलसंधारणाची उत्तम कामे करणाऱ्या गावातील यशोगाथांचा समावेशही या पुस्तिकेत करण्यात आला आहे. पुस्तिका जलसंधारण कामांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

# माजी उपसरपंचाच्या मारेकऱ्यांना अटक करा

## पिंपळगाव माळवीच्या ग्रामस्थांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

**● नगर । वीरभूमी–**

मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच लताबाई नानाभाऊ कराळे यांची निर्गुण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी शिव प्रहार संघटनेच्या वतीने व पिंपळगाव माळवी च्या ग्रामस्थांच्या वतीने पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले यावेळी शिव प्रहार संघटनेचे युवक तालुकाप्रमुख गोरक्षनाथ आढाव समवेत पिंपळगाव माळवी ग्रामस्थ आशा आढाव, वैशाली आढाव, मनीषा कराळे, अनिल वाघ, गोरक्षनाथ रणसिंग, नानाभाऊ कराळे, जालिंदर कराळे, सागर गुंड, भरत आढाव, धोंडीभाऊ कराळे, जालिंदर काळे, संगीता काळे, आशा गुंड, कांचन गुंड, शरीफा शेख आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुढे निवेदनात म्हटले आहे की, मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच कै. लताबाई नानाभाऊ कराळे यांची दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी निर्गुण पणे हत्या करण्यात आलेली आहे. सदर हत्येला तीन महिने उलटून देखील अजूनही कुठल्याही प्रकारचा तपास लागलेला नाही. अंत्यविधीच्या वेळी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांनी आश्वासन दिले होते. दोन दिवसात तपास लावू मात्र तीन महिने होऊन देखील कुठल्याही प्रकारचे आरोपी सापडले नाहीत. त्यामुळे मौजे पिंपळगाव माळवी येथील महिला व ग्रामस्थ भयभीत झालेले आहे. तसेच गावांमध्ये पोलीस प्रशासना विरोधात ग्रामस्थांचा असतोष निर्माण झाला आहे. हा तपास पोलीस यंत्रणेंनी गहाळ केला की काय? अशी उलट सुलट चर्चा पिंपळगाव माळवी सह परिसरातील गावांमध्ये चालू आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक यांनी येत्या ८ दिवसाच्या आत तपास लावावा अन्यथा शिव प्रहार संघटना व मौजे पिंपळगाव माळवी ग्रामस्थ पीडित कुटुंबीयांसह मंगळवार दिनांक १३ मे २०२५ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचे सांगितले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## राजूर येथील काविळ साथरोग नियंत्रणासाठी विशेष पथकाची नेमणूक करा

### मारुती मेंगाळ यांचे आरोग्य मंत्री आबिटकर यांना निवेदन



**● अकोले । वीरभूमी-**

अकोले तालुक्यातील राजूर येथे गेली अनेक दिवसांपासून दूषित पिण्याच्या पाण्यामुळे काविळ या आजाराचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव वाढला आहे. यात २०० पेक्षा जास्त नागरिकांना या आजाराची लागण झाली असून या मध्ये दोन रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे. यामुळे मारुती मेंगाळ यांच्यासह शिष्टमंडळाने आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेत काविळ साथरोग नियंत्रणासाठी विशेष पथकाची नेमणूक करण्याची मागणी केली आहे.

अकोले तालुक्यातील राजूर हे गाव मोठे असून चाळीस गाव डांगणची मुख्य बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. या राजूर शहराकरिता निळवंडे धरणातून पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा योजना सुरू आहे. राजूर येथील पाण्याची टाकी अस्वच्छ असल्याने दूषित पाण्यामुळे या कावीळ सारख्या आजाराची येथील नागरिकांना लागण झाली आहे.

स्थानिक आरोग्य विभाग आणि जिल्हा आरोग्य विभाग यात लक्ष घालून आहे तरी देखील रुग्णांचा आकडा वाढताना दिसत आहे. राजूर येथील काविळचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी, तसेच या आजाराने बाधित झालेल्या रुग्णांना योग्य तो उपचार मिळवण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष पथकाची नेमणूक करावी, यासाठी आज मारुती मेंगाळ यांच्या शिष्टमंडळाने आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची नगर येथे जाऊन भेट घेत मागणी केली. यावर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी पुणे येथील संचालक तसेच नाशिक येथील उपसंचालक, नगरचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना काविळ या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा, अशा सूचना दिल्या असल्याची माहिती मारुती मेंगाळ यांनी दिली आहे. याप्रसंगी जिल्हा मजूर फेडरेशनचे संचालक सुशांत गजे, शिवसेना नेते जावेद जहागिरदार, राम मुर्तडक आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# विखे फाउंडेशनच्या 'सिंधू' वसतिगृहाचे लोकार्पण

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन । सर्व सुविधा व सुरक्षिततेला दिले प्राधान्य

**● नगर । वीरभूमी-**

शैक्षणिक आरोग्य क्षेत्रात नावलौकीक मिळविलेल्या पद्मश्रीं डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनने वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थीनीसाठी उभारलेल्या सिंधू वसतिगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. विखे पाटील फाउंडेशनच्या कॅम्पस मध्ये सुमारे सहाशे विद्यार्थीनीच्या राहाण्याची सुविधा असलेले वसतिगृह फाउंडेशनचे चेअरमन तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आले आहे. या वसतिगृहात सर्व सुविधा आणि सुरक्षितता याला प्राधान्य देण्यात आले आहे.




लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९३ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून या सिंधू वसतिगृहाच्या इमारतीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तसेच विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण, आ. शिवाजीराव कर्डीले, डॉ. सुजय विखे पाटील, आ. मोनिका राजळे, आ. काशिनाथ दाते, आ. विठ्ठलराव लंघे, आ. अमोल खताळ, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालीनी विखे पाटील, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, फाउंडेशनचे डॉ. अभिजीत दिवटे, सर्व विश्वस्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी रिमोट द्वारे वसतिगृहाच्या सिंधू नामफलकाचे तसेच कोनशिलेचे अनावरण केले. इमारतीची पाहाणी करून समाधान व्यक्त केले. डॉ. सुजय विखे पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, शिक्षण आणि आरोग्य सुविधा निर्माण करण्यात फाउंडेशनची भूमिका नेहमीच सामाजिक बांधिलकीची राहीली आहे. ग्रामीण भागातील लोकांना चांगल्या परंतू कमी खर्चात आरोग्य सुविधा देण्याचा विचार खासदार साहेबांनी दिला तोच पुढे घेवून जाण्याचे काम आम्ही करीत आहोत.

अवयव प्रत्यारोपणची सुविधा डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे सुरू झाली आहे. उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून डॉ. विखे पाटील महाविद्यालयचा गौरव झाला असल्याचा अभिमान असल्याचे विखे पाटील म्हणाले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांवर महायुतीचा झेंडा फडकवा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । भाजपच्या अहिल्यानगर कार्यालयाचे भूमिपूजन

**● नगर । वीरभूमी-**

आगामी चार ते पाच महिन्यांत स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणूका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपली ही एक नवीन परीक्षा असणार आहे. अहिल्यानगरमध्ये विधानसभेची परीक्षा जशी मेरिटमध्ये पास झालात, त्याप्रमाणे नगरसह महाराष्ट्रातील सगळ्या स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत महायुतीच्या निवडून येण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा व महायुतीचा झेंडा फडकवा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप पदाधिकाऱ्यांसह कार्यकत्यांना दिले.



भाजपच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्याहस्ते रिमोटद्वारे करण्यात आले. यानिमित्त सहकार सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह राजेभोसले, आ. शिवाजीराव कर्डिले, आ. मोनिका राजळे, आ. विक्रम पाचपुते, माजी खा. सुजय विखे पाटील, माजीमंत्री बबनराव पाचपुते, माजी आ. वैभव पिचड, भाजप महामंत्री विजय चौधरी, लक्ष्मण सावजी, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नितीन दिनकर, अभय आगरकर, अक्षय कर्डिले, अच्युत पिंगळे आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, राज्यात सर्वाधिक दीड कोटी सदस्यसंख्या असणारा भाजप हा एकमेव पक्षा आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात भाजपचे प्रशस्त कार्यालय होत आहे. त्याप्रमाणे नगरमध्ये कार्यालयाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून पक्ष विस्तारासाठी बळ मिळणार आहे. भाजपचे कार्यालय सामान्य माणसांसाठी हक्काची जागा असणार असून, यातून नागरिकांच्या विविध समस्यांची सोडवणूक या कार्यालयातून होणार आहे. तसा विश्वास कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी निर्माण करावा, असा सूचना केल्या. आगामी स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत महायुतीचा झेंडा फडकविण्यासाठी आतापासून पूर्ण ताकदीने कामाला लागा, असे आदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिले.

## आढळगाव ते जामखेड टप्प्याच्या रखडलेल्या कामामुळे नागरीक हवालदिल

### सततच्या आश्वासनांची पूर्ती होत नसल्याने सुभान तांबोळी यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी वरील आढळगाव ते जामखेड या अपूर्ण काम व रखडलेल्या टप्प्याचे सतत आंदोलन करूनही व दिलेल्या आश्वासनांची पूर्ती होत नसल्याने अनेक महिन्यांपासून स्थानिक नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्ते विकास महामंडळाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे याबाबत अनेकवेळा आंदोलन केलेले सामाजिक कार्यकर्ते सुभान तांबोळी यांनी पुन्हा उपोषण आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. श्री. तांबोळी हे दि. १३ रोजीपासून आमरण उपोषणाला बसणार आहेत.





याबाबत सामाजिक कार्यकर्ते सुभान तांबोळी यांनी श्रीगोंदा तहसीलदार यांना निवेदन देत उपोषणाचा इशारा दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की आढळगाव ते जामखेड या टप्प्यात अनेक ठिकाणी रस्त्याची कामे अपूर्ण ठेऊन रस्ता अतिशय खराब अवस्थेत सोडला आहे. यामुळे गेली चार पाच वर्षे अपघातांची मालिका सुरू होऊन २० ते २५ निष्पाप व्यक्तींचा हकनाक बळी गेला आहे. अपूर्ण कामामुळे धुळीचे साम्राज्य, अस्वच्छता आणि अपूर्ण गटारांमुळे पाणी साचून साथीच्या रोगांची नित्य कुसेवा सुरू आहे. धुळीमुळे श्वसनविकार, पिकांची हानी व ट्रॅफिक जॅम नित्याचेच झाले आहे.

यापूर्वीही अनेक दिवसांचे उपोषण आंदोलने केली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन देऊन उपोषण मागे घेण्यास भाग पाडले. मात्र, आश्वासनांची पूर्तता न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र स्वरूपाची नाराजी पसरली आहे. या रस्ता कामावरील दोषी प्रशासकीय अधिकारी राष्ट्रीय महामार्ग मंडळ अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता व काम घेतलेले निखिल कन्स्ट्रक्शनचे सर्व ठेकेदार यांना काळया यादीत टाकावे व कारवाई करून संबंधितांवर खुनासारखे गंभीर गुन्हे दाखल करण्याची मागणी सुभान तांबोळी यांनी केली आहे. निवेदन देताना अरबाज तांबोळी व इरफान तांबोळी उपस्थित होते.

निवेदनाच्या प्रती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खा. निलेश लंके, आ. विक्रम पाचपुते, आ. हेमंत ओगले, जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना पाठवल्या आहेत.

# जनतेला सीआरपी उपचार पद्धतीचे प्रशिक्षण आवश्यक

## डॉ. सचिन दरंदले । बंग मित्र मंडळाच्यावतीने पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयाला साहित्य भेट

**● पाथर्डी । वीरभूमी-**

हृदयविकारांचे वाढते प्रमाण बघता रुग्णाला तातडीचा उपचार म्हणून सीआरपी उपचार पद्धतीचे सरसकट प्रशिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून आता जनतेला प्रशिक्षण देऊन हृदय विकारामुळे होणारे मृत्यू दर घटून प्राथमिक उपचार गोल्डन पिरियडमध्ये मिळाल्यास रुग्णांचा जीव वाचू शकतो, असे मत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले यांनी व्यक्त केले.



पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात माजी नगरसेवक रामनाथ बंग मित्र मंडळातर्फे ऑपरेशन थिएटर मध्ये साधनसामग्री निर्जंतुकीकरण यंत्र समारंभ पूर्वक भेट देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, डॉ. विशाल वाघ, डॉ. अभिजीत पवार, डॉ. नितीन शिंदे, डॉ. मनीषा खेडकर, डॉ. अविनाश कराड यासह आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, मित्र मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध वक्त्यांनी उपजिल्हा रुग्णालयातील सेवा कार्याचा आढावा घेत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले.

डॉ. दरंदले म्हणाले, जिल्हा रुग्णालयाच्या खालोखाल येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णसंख्या असून मागील महिन्यात सुमारे साडेआठ हजार रुग्णांवर येथे उपचार करण्यात आले. स्थानिक नागरिकांचे सर्व प्रकारचे सहकार्य लाभून तातडीची गरज असलेले साहित्य लोकसहभागातून देत नागरिकांकडून सामाजिक जबाबदारीचे दर्शन घडवले जात आहे. सी. आर. पी. चे देऊ प्रशिक्षण, करू या प्राणाचे रक्षण.. असे ब्रीदवाक्य डोळ्यापुढे ठेवून राज्य शासनाने अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. लोकांचा प्रतिसाद बघता असा उपक्रम निश्चितच अत्यंत लाभदायी ठरणार आहे. सर्वसामान्य माणूस सुद्धा हृदयविकाराच्या झटक्यामध्ये रुग्णाला प्राथमिक मदत करून जीव वाचवू शकतो. यासाठी सर्व शासकीय रुग्णालय पातळीवर सर्वसामान्य जनतेसाठी प्रशिक्षण सुविधा देऊन सार्वजनिक मंडळे, देवस्थान समिती कर्मचारी, महाविद्यालयातील युवक अशा घटकांना प्राधान्याने सीआरपीचे प्रशिक्षण दिले जाईल.

रामभाऊ बंग मित्र मंडळाने निर्जंतुकीकरण संच भेट देऊन रुग्णालयाचे मोठी गरज भागविली असून अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान तर्फे रुग्णालयाच्या आवारात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी जेवण शेड बांधून दिली जाणार आहे. अभय आव्हाड म्हणाले, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक व सर्व कर्मचाऱ्यांचा लोकसंपर्क चांगला असून येथील सेवेचा मोठा लाभ गरजूंना होत आहे. रुग्णालयाची क्षमता व तज्ञांच्या नियुक्तीसाठी शासनाने सहकार्य करावे. शहरातील नागरिक, कार्यकर्ते व सेवाभावी संस्था आवश्यक सहकार्य करतील. रामभाऊ बंग मित्र मंडळाचा उपक्रम स्तुत्य व प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन मुनोत तर सूत्रसंचालन करून शंकर पंडित यांनी आभार मानले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवीन पोलीस वसाहतीचे भूमिपूजन

**● नगर । वीरभूमी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथे १०२ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या आणि पोलीसांसाठी ३२० नवीन निवासस्थाने असलेल्या वसाहतीचे, तसेच राखीव पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया,जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता श्री. बाविस्कर, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नव्याने उभारण्यात येणारी पोलीस वसाहत व राज्य राखीव पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती विषयी माहिती जाणून घेतली.

पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर ८ निवासस्थाने याप्रमाणे ८० निवासस्थाने असून अशा एकूण चार इमारती उभारण्यात येत आहेत. पोलीस अंमलदार निवासस्थानामध्ये २ बेडरुम, हॉल, किचन असा ५० चौ.मी क्षेत्रफळ आहे. पार्किंगमध्ये सर्वत्र सोलरद्वारे विद्युत पुरवठा असून अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, सांडपाणी शुद्धीकरण व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था आदी सुविधा असणार आहेत.

नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्रशासकीय इमारतीमध्ये शस्त्रागार, राखीव पोलीस निरीक्षक कार्यालय, टेंट हाऊस, क्रीडा साहित्य कक्ष, बँड रुम, बेल ऑफ आर्मस् आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.